# हिवाळी अधिवेशन-२०२४ चा संक्षिप्त अहवाल

**अध्यक्ष** : आज हिवाळी अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. आजच्या दिवसाचे कामकाज आता संपत आलेले आहे. आता मी नव्याने घटित झालेल्या पंधराव्या विधानसभेच्या नागपूर येथील पहिल्या हिवाळी अधिवेशनातील कामकाजाचा संक्षिप्त आढावा आपल्यासमोर सादर करीत आहे. हा आढावा सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

पंधराव्या विधानसभेत एकूण ७८ सन्माननीय सदस्य प्रथमच निवडून आलेले आहेत. यापैकी ५ सन्माननीय सदस्य हे विधानपरिषद सभागृहातून प्रथमच विधानसभेवर निवडून आले आहेत. उर्वरित ७३ सदस्य हे प्रथमच विधानसभेवर निवडून आलेले आहेत. या सदस्यांपैकी अनेक सन्माननीय सदस्यांनी पहिल्याच अधिवेशनाच्या कामकाजामध्ये उत्तम सहभाग नोंदविला आहे. या पुढील काळात आपण सर्वांनीच विविध संसदीय आयुधांचा प्रभावीपणे वापर करुन लोकहिताच्या प्रश्नांना न्याय मिळवून द्यावा, अशी आशा करतो. भविष्यातील कामकाजासाठी मी सर्व सन्माननीय सदस्यांना मनापासून शुभेच्छा देतो.

आता मी या सत्र काळातील कामकाजाचा आढावा सभागृहासमोर ठेवतो.

| | | |
|---|---|---|
| एकूण बैठकींची संख्या | : | ६ |
| प्रत्यक्षात झालेले कामकाज | : | ४६ तास २६ मिनिटे |
| वाया गेलेला वेळ | : | १० मिनिटे |
| दररोजचे सरासरी कामकाज | : | ७ तास ४४ मिनिटे |

**औचित्याचे मुद्दे**

| | | |
|---|---|---|
| प्राप्त | : | ३१६ |
| चर्चा झालेले | : | १७७ |

**नियम ९७ (सत्त्याण्णव) अन्वये स्थगन प्रस्तावाच्या सूचना**

| | | |
|---|---|---|
| प्राप्त सूचना | : | ३४ |
| मान्य सूचना | : | **निरंक** |
| चर्चा झाली | : | **निरंक** |

**अल्पकालीन चर्चा**

प्राप्त : १ मान्य : १ चर्चा झाली : १

**शासकीय ठराव -**

| | | |
|---|---|---|
| प्राप्त सूचना | : | १ |
| मान्य सूचना | : | १ |
| चर्चा झालेल्या सूचना | : | १ |

**नियम २९३ (दोनशे त्र्याण्णव) अन्वये प्रस्ताव :**

| | | |
|---|---|---|
| प्राप्त सूचना | : | १ |
| मान्य सूचना | : | १ |
| चर्चा झाली | : | **निरंक** |

**शासकीय विधेयके :**

**विधानसभा विधेयके**

| | | |
|---|---|---|
| पु:रस्थापित | : | १५ |
| संमत | : | १३ |
| संयुक्त समितीकडे | : | १ |
| प्रलंबित | : | १ |

**विधानपरिषद विधेयके**

| | | |
|---|---|---|
| संमत | : | ४ |

**सन्माननीय सदस्यांची उपस्थिती**

| | | |
|---|---|---|
| जास्तीत जास्त उपस्थिती | : | ८७.८० टक्के |
| कमीत कमी उपस्थिती | : | ४८.३७ टक्के |
| एकूण सरासरी उपस्थिती | : | ७२.९० टक्के |

**अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली.**

या सत्र काळात मला सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या अधिवेशनाचा समारोप करताना मी माननीय मुख्यमंत्री, दोन्ही माननीय उप मुख्यमंत्री, सर्व माननीय मंत्री, माननीय तालिका सभाध्यक्ष, सर्व पक्षांचे माननीय गट नेते, माननीय मुख्य प्रतोद, माननीय प्रतोद, सर्व सन्माननीय सदस्य तसेच, विधानमंडळाचे अधिकारी, सुरक्षा विभागाचे, मंत्रालयाचे अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच पत्रकार मित्र या सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

**आपणा सर्वांना, येणाऱ्या नवीन वर्षाच्या शुभेच्छा.**

...........